# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक २५/०७/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दि. ११/०७/२०१६ व दिनांक १४/०७/२०१६रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. ११/०७/२०१६ व दिनांक १४/०७/२०१६रोजीचे इतिवृत्त कायम करणेत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्रीम. कांता पाटील** |
| २ | वसई-विरार शहर महानगरपालिका शालेय जिल्हा क्रिडा स्पर्धा २०१६ आयोजनाबाबत. | **ठराव :-** वरील बाबीवर अंदाजित रक्कम रुपये २६ लक्ष (अक्षरी- सव्वीस लक्ष) इतका खर्च अपेक्षित असून सन २०१६-२०१७ च्या अर्थ संकल्पात २ कोटी १२ लक्ष (अक्षरी- दोन कोटी बारा लक्ष मात्र) इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. तरी महानगरपालिका हद्दीतील विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास आजची सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर** |
| ३ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या माहिला व बालकल्याण विभागाअंतर्गत जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षात शालेय साहित्य वाटप करणेकामी सर्वात कमी दराच्या निविदाकाराच्या दरास मंजुरी देवून संविदा करणेस मंजुरी देणे. | **ठराव** :- गोषवाऱ्यात नमुद केल्याप्रमाणे विविध ठेकेदारांमार्फत विविध साहित्य पुरवठा करणेकामी प्राप्त दर हे सर्वात कमी दर आहेत. सदर दरांचे बाजारभावाप्रमाणे पडताळणी केली असता, दर बाजारभावाप्रमाणे योग्य व वाजवी आहेत. सदरचे निविदा दर मुख्य लेखाअधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मंजूरीस शिफरस केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३ (क) अन्वये सर्वात कमी दरांच्या ई-निविदाधारकांबरोबर संविदा करण्यास व जि.प. शाळेतील मुलांना आवश्यकतेप्रमाणे साहित्य खरेदी करण्यास तसेच येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. कांता पाटील सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर** |
| ४ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या माहिला व बालकल्याण समितीअंतर्गत अंगणवाडी व बालवाडी विद्यार्थ्यांसाठी सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षात साहित्य वाटपासाठी प्राप्त निविदा दरांपैकी सर्वात कमी दराच्या निविदेस मंजुरी देवून संविदा करणेस मान्यता देणे. | **ठराव** :- वरीलप्रमाणे प्राप्त ई-निविदांमधील दराची तुलनात्मक पडताळणी केली असता वाटाघाटी अंतीम मे.साक्षी एंटरप्रायजेस घटक क्र. २ प्लास्टिक वॉटर बॅग प्रति नग दर रक्कम रु. १८.९०/- घटक क्र. ३ प्लास्टिक टिफीन बॉक्स प्रति नग दर रक्कम रु. १३.९५/- तसेच मे. वरायटी बुक सेंटर अँड स्टेशनरी घटर क्र. १ सॅग दप्तर प्रती नग दर रक्कम रु. ९५/- घटक क्र. ४ प्लास्टिक क्रेऑन प्रति नग दर रक्कम रु. ३८/- हे ई-निविदा दर तुलनात्मक कमी आहेत. सदर दरांची बाजारभावाप्रमाणे पडताळणी केली असता, दर बाजारभावाप्रमाणे योग्य व वाजवी आहेत. सदरचे निविदा दर मुख्य लेखाअधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मंजूरीस शिफरस केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका |

| | | |
|---|---|---|
| | | अधिनियम ७३ (क) अन्वये सर्वात कमी दरांच्या ई-निविदाधारकांबरोबर संविदा करण्यास व अंगणवाडीतील मुलांना आवश्यकतेप्रमाणे साहित्य खरेदी करण्यास तसेच येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समिर डबरे सूचक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले** |
| ५ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या माहिला व बालकल्याण समितीअंतर्गत सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षात शालेय विद्यार्थ्यांना सायकली वाटप करणेकामी प्राप्त निविदांमधील सर्वात कमी दराच्या ई-निविदेस मंजुरी देवून संविदा करणेस मान्यता देणे. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्राप्त ई-निविदांमधील दराची तुलनात्मक पडताळणी केली असता त्यामध्ये मे. ओम साई एंटरप्रायजेस यांचे ई-निविदा दर तुलनात्मक कमी आहेत. मे. ओम साई यांच्याशी वाटाघाटी करुन प्राप्त दर प्रति नग ४०५५/- रु. सर्वात कमी असून या दराची बाजारभावाप्रमाणे पडताळणी केली असता प्राप्त दर योग्य व वाजवी आहेत. सदरची निविदा दर मुख्य लेखाअधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मंजूरीस शिफरस केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३ (क) अन्वये कमी दरांच्या ई-निविदाधारकांबरोबर संविदा करण्यास व प्रति नग रक्कम रु. ४०५५/- रु. या दराने हिरो कंपनी, मॉडेल मिस इंडिया गोल्ड, हिरो कंपनी, रोझल, ब्लॅक मॉडेल असे दोन्ही आवश्यकतेप्रमाणे सायकली खरेदी करणे व येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. मनिषा जाधव सूचक :- मा.श्रीम. कांता पाटील** |
| ६ | प्रभाग समिती ब नालासोपारा (पूर्व) येथील मनवेलपाडा मुख्य रस्ता ते नॅशनल इंग्लिश शाळेपर्यंत ३० मी.डी.पी. रस्त्याच्या डाव्या बाजुला पाईप गटार बनविणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम निविदाधारकांबरोबर संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव** :- उपरोक्त निविदांची तुलना करता कमीत कमी दराची मे. प्राईम डेव्हलपर्स ह्यांची ४.९०% जास्त दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मे. प्राईम डेव्हलपर्स यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेंत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतीम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री.मिलिंद घरत** |
| ७ | प्रभाग समिती ब नालासोपारा (पूर्व) येथील मनवेलपाडा मुख्य रस्ता ते नॅशनल इंग्लिश शाळेपर्यंत ३० मी.डी.पी. रस्त्याच्या उजव्या बाजुला पाईप गटार बनविणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराच्या निविदाधारकांसोबत संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव** :- उपरोक्त निविदांची तुलना करता कमीत कमी दराची मे. प्राईम डेव्हलपर्स ह्यांची ४.९०% जास्त दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मे. प्राईम डेव्हलपर्स यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेंत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतीम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.मनिषा जाधव सूचक :- मा.श्री.प्रशांत राऊत** |
| ८ | विरार पाणी पुरवठा विभागात पाणी पुरवठा व्यवस्थापन करणे प्राप्त निविदांपैकी लघुत्तम निविदाधारकांसोबत संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे. आर.जी. कन्स्ट्रक्शन यांची वाटाघाटीनंतर प्राप्त अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २४% जास्त दराने निविदेस मान्यता देण्यांत येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यांस मान्यता देणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.समिर डबरे सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर** |

| | | |
|---|---|---|
| ९ | नालासोपारा पाणी पुरवठा विभागात पाणी पुरवठा व्यवस्थापन करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम निविदाधारकांसोबत संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे. श्री. राजू संभाजी बोरसे यांची वाटाघाटीनंतर प्राप्त अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २४% जास्त दराने निविदेस मान्यता देण्यांत येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यांस मान्यता देणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.मिलिंद घरत सूचक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले** |
| १० | नवघर माणिकपुर व वालीव पाणी पुरवठा विभागात पाणी पुरवठा व्यवस्थापन करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम निविदाधारकांसोबत संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे. आर.जी. कन्स्ट्रक्शन यांची वाटाघाटीनंतर प्राप्त अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २४% जास्त दराने निविदेस मान्यता देण्यांत येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यांस मान्यता देणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री.प्रकाश रॉड्रीक्स** |
| ११ | प्रभाग समिती "आय" पाणी पुरवठा विभागात पाणी पुरवठा व्यवस्थापन करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम निविदाधारकांबरोबर कामाची संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे. आर.जी. कन्स्ट्रक्शन यांची वाटाघाटीनंतर प्राप्त अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २४% जास्त दराने निविदेस मान्यता देण्यांत येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यांस मान्यता देणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समिर डबरे सूचक :- मा.श्री.प्रकाश रॉड्रीक्स** |
| १२ | वसई-विरार शहर महानगरपालिका उसगाव / शिरवली २० द.ल.ली. पाणी पुरवठा योजना चालविणे व जलवाहिन्याची देखभाल दुरूस्ती करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम निविदाधारकांसोबत संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे. आर.जी. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ६.००% जास्त दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यांस मान्यता देणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. मनिषा जाधव सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर** |
| १३ | वसई-विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना (सुर्या उद्‌भव) १०० द.ल.ली. क्षमता योजना चालविणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम निविदाधारकांसोबत संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे. ॲशलॉन इंटरप्रायजेस यांची अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २८.९०% जास्त दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यांस मान्यता देणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. मनिषा जाधव सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर** |
| १४ | वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये क्रिकेट मैदानावर साईड स्क्रीन | **ठराव** :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. सुहास एंटरप्रायजेस ह्यांची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली |

| | | |
|---|---|---|
| | बसविणेकामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | आहे. या कामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे व कामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर** |
| १५ | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात रस्त्यावरील रहदारी/वाहतुक नियंत्रणासाठी १६ ठिकाणी सिग्नल यंत्रणा बसविणे व ५ वर्षे देखभाल दुरुस्ती करणे कामाची संविदा करणेबाबत. | **ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात रस्त्यावरील रहदारी/वाहतुक नियंत्रणासाठी १६ ठिकाणी सिग्नल यंत्रणा बलविणे व ५ वर्ष देखभाल दुरुस्ती करणे कामासाठी प्राप्त झालेल्या मे.सी.एम.एस कॉम्प्युटर्स लिमिटेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.९७% कमी दराची निविदा मंजूर करुन कामाची संविदा करणे व त्याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.मिलिंद घरत सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर** |
| १६ | वसई-विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना (सुर्या उद्भव) १०० द.ल.ली. क्षमता योजना चालविणे व जनवाहिन्यांची देखभाल व दुरुस्ती करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दरांची निविदा मंजुर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे. के.आर. कन्स्ट्रक्शन यांची वाटाघाटीनंतर प्राप्त अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ४.९५% जास्त दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यांस मान्यता देणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समिर डबरे सूचक :- मा.श्रीम.कांता पाटील** |
| १७ | मासवण येथील पंपगृहातील स्टॅन्डबाय पंप, मोटर व वॉल दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामास अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे तसेच सदर कामी निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. मनिषा जाधव सूचक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले** |
| १८ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या दैनंदिन कामकाजाकरीता उपकरणे, रुग्णालयीन साहित्य, लस टोचणी साहित्य व कापड प्रकार पुरवठा करणेकामी मागविण्यांत आलेल्या ई-निविदेस मा. स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता असल्याने सदरचा विषय मंजुरीस्तव सादर. | **ठराव** :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीस आरोग्य विभागाच्या दैनंदिन कामकाजा करीता उपकरणे, रुग्णालयीन साहित्य, लस टोचणी साहित्य व कापड प्रकार पुरवठा करणे कामी मागविण्यांत आलेल्या ई-निविदेस मा.स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता असल्याने सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, प्राप्त ई-निविदांमधील ज्या ई-निविदांमधील ज्या ई-निविदांच्या घटकांचे स्पर्धात्मक तुलना करण्यासाठी तीन दर प्राप्त नाहीत अशा वरील सुचीतील बाब क्र.२ मधील पृष्ठ क्र.१३१ ते १३३ वरील घटकांचे फेर ई-निविदा मागविण्यात याव्या. वरील सोबतच्या सुचीतील बाब क्र.१ मधील व पृष्ठ क्र. १२९ ते १३१ वरील घटकांचे तीन दर प्राप्त आहेत ते दर योग्य व वाजवी आहेत. सदरच्या ई-निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मंजुरीस शिफारस केली आहे. तरी सदर बाब क्र.१ मधील पृष्ठ क्र. १२९ ते १३१ मधील घटकांच्या कमी दराच्या ई-निविदाकारांबरोबर महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३ (क) अन्वये संविदा करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे व वरील सुचीतील बाब क्र.२ मधील पृष्ठ क्र. १३१ ते १३३ वरील |

| | | |
|---|---|---|
| | | घटकांचे फेर ई-निविदा मागविणेस ही सभा मंजूरी देत आहे. तसेच याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर** |
| १९ | औषधे, प्रयोगशाळा, रसायने व साथ प्रतिबंधक लस पुरवठा करणेकामी मागविण्यांत आलेल्या ई-निविदेस मा. स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता असल्याने सदरचा विषय मंजुरीस्तव सादर. | **ठराव :-**औषधे, प्रयोगशाळा रसायने व साथ प्रतिबंधक लस पुरवठा करणेकामी मागविण्यांत आलेल्या ई-निविदेस मा.स्थायी समितीच्या मंजूरीची आवश्यकता असल्याने सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, प्राप्त ई-निविदांमधील ज्या ई-निविदांच्या घटकांचे स्पर्धात्मक तुलना करण्यासाठी तीन दर प्राप्त नाहीत अशा वरील सुचीतील बाब क्र.२ मधील पृष्ठ क्र.९५ ते ९७ वरील घटकांचे फेर ई-निविदा मागविण्यात याव्या. वरील सोबतच्या सुचीतील बाब क्र. १ मधील पृष्ठ क्र.९३ ते ९५ वरील घटकांचे तीन दर प्राप्त आहेत ते दर योग्य व वाजवी आहेत. सदरच्या ई-निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मंजुरीस शिफारस केली आहे. तरी सदर बाब क्र.१ मधील पृष्ठ क्र. ९३ ते ९५ मधील घटकांच्या कमी दराच्या ई-निविदाकारांबरोबर महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३ (क) अन्वये संविदा करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे व वरील सुचीतील बाब क्र. २ मधील पृष्ठ क्र.९५ ते ९७ वरील घटकांचे फेर ई-निविदा मागविणेस ही सभा मंजुरी देत आहे. तसेच याकामी येणाऱ्या संपुर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री.प्रशांत राऊत** |